5.28

Scaning
Clear

Wednesday, March 05, 2008

5:03:27 PM

*Original*
नोंदणी 39 म.
Regn. 39 M

# पावती

**पावती क्र. :** 2281

**गावाचे नाव** आडगांव **दिनांक** 05/03/2008

**दस्तऐवजाचा अनुक्रमांक** नसन2 - 02281 - 2008

**दस्ता ऐवजाचा प्रकार** अभिहस्तांतरणपत्र
(25-ब) पुढील हदीत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर

**सादर करणाराचे नाव:** शामकांत केशव कोतकर - रा 1 स्वप्नपूर्ती देवशांती प्रभात रोड गल्ली नं 13 पुणे वय 38 -

| | | |
|---|---|---|
| **नोंदणी फी** | :- | 30000.00 |
| **नक्कल (अ. 11(1)), पृष्टांकनाची नक्कल (आ. 11(2)), रुजवात (अ. 12) व छायाचित्रण (अ. 13) -> एकत्रित फ़ी (25)** | :- | 500.00 |
| **एकूण** | रु. | **30500.00** |

आपणास हा दस्त अंदाजे 5:17PM ह्या वेळेस मिळेल

सह दुय्यम निबंधक
नाशिक 2

बाजार मुल्य: 11625000 रु. मोबदला: 11400000रु.
भरलेले मुद्रांक शुल्क: 581250 रु.

देयकाचा प्रकार :डीडी/धनाकर्षाद्वारे;
बँकेचे नाव व पत्ता: विश्वास बँक नाशिक;
डीडी/धनाकर्ष क्रमांक: 69488; रक्कम: 30000 रू.; दिनांक: 03/03/2008

VISHWAS CO-OP. BANK LTD., NASHIK FRANKING DEPOSIT SLIP

Customer Copy R. No. 38386

Deposit Br. HPT College Rd Br. Date 03/03/08

Pay to : 0030 Acct Stamp Duty Nashik

| | | |
|---|---|---|
| Franking Value | Rs. | 5,81,250/- |
| Service Charges | Rs. | |
| Total | Rs. | 5,81,250/- |

Name of Stamp duty paying party

शामकांत केशव कोतकर

हस्ते- मनोज केशव कोतकर

D.D. / Cheque No.

Drawn on Bank

(For Bank's Use only)

Tran ID 57317

Franking Sr. No. 59627

Vishwas Co-op. Bank Ltd.,
H.P.T. College Road Branch, Nashik-5
Officer

Br. Manager/Officer

नसन - २

दस्त क्र. (८२९) २००८

१ / २५

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, दोन्ही मुद्रा
सत्यमेव जयते

विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक

स्टॅम्प घेणाऱ्याचे नांव : शामकांत केशव कोतकर

पत्ता : १, स्वागत देवराती, प्रभात रोड, पुणे

हस्ते : मनोज केशव कोतकर

रक्कम रु. : -581250 पावती क्र. : 38386

रुपये अक्षरी : पाच कोटी एक्याऐंशी हजार दोनशे पन्नास मात्र

शाखाधिकारी

Vishwas Co-op Bank Ltd., Nashik
D-5/STP(V)/C.R. 13/2004/1864-66

भारत INDIA 59627 140098
SPECIAL ADHESIVE महाराष्ट्र MAR 03 2008
Rs.0581250/- PB5121 14738
STAMP DUTY MAHARASHTRA

मौजे आडगांव (नाशिक)

गट क्रमांक- ४६

विभाग क्रमांक-२-१० स्टॅम्प रूपये-५,८१,२५०/-

मुल्यांकन रूपये-१,१६,२५,०००/-दस्तऐवज रूपये-१,१४,००,०००/-

:: श्री ::

:: कायमचे फरोक्त खरेदीखत ::

कायमचे फरोक्त खरेदीखत आज दिनांक- ३, मार्च, २००८,

वार:- सोमवार ते दिवशी, नाशिक मुक्कामी . . .

(पान क्र. १ वर)

SEAL OF THE SUB REGISTRAR Class-2
सत्यमेव जयते
NASIK

नासन - २
दस्त क्र.(२२६७) २००८
२ /२५

(१) श्री. शामकांत केशव कोतकर,
(पॅन नंबर- अेबीईपीके३५८१डी)
वय:- ३८ वर्ष, व्यवसाय:- शेती व व्यापार
राहणार :- १, स्वागत देवशांती, प्रभातरोड,
गल्ली नंबर-१३, पुणे.

(२) श्री. गणेश निंबा शिरोडे,
(पॅन नंबर- अेसीएमपीएस२७३२एच)
वय:- ३७ वर्ष, व्यवसाय:- व्यापार
राहणार :- मु.पो. कोपरगांव, जि.अहमदनगर.

(३) श्री. राकेश रमेश मिरजे,
(पॅन नंबर- अेअेएक्सपीएम५१२१एच)
वय:- ३९ वर्ष, व्यवसाय:- शेती व व्यापार
राहणार :- रैना बंगलो, शिवाजी नगर (दक्षिण)
सांगली - ४१६ ४१६.

लिहून घेणार

....यांसी....

(१) श्रीमती. तुळसाबाई भ्र. निवृत्ती मते,
वय:- ५१ वर्ष, व्यवसाय:- घरकाम व शेती,

(२) श्री. संजय निवृत्ती मते,
वय:-३४ वर्ष, व्यवसाय:- शेती.

(३) श्री. सुकदेव निवृत्ती मते,
वय:- ३२ वर्ष, व्यवसाय:- शेती.

(४) श्री. यादव निवृत्ती मते,
वय:-३० वर्ष, व्यवसाय:- शेती.

सर्व राहणार:-मु.पो. आडगांव,तालुका व जिल्हा - नासिक
क्रमांक-१ ते ४ यांचे जनरल मुखत्यार म्हणून....
श्री. योगेश बाळकृष्ण शिरापुरे,
वय:- ३८ वर्ष, व्यवसाय:- शेती व व्यापार,
राहणार-बी-२१२, मेघदुत शॉपिंग सेंटर,सी.बी.एस, नासिक

लिहून देणार

कारणे फरोक्त खरेदीखत लिहून देतो ते खालीलप्रमाणे:-

(पान नं. ३ वर)

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR Class-2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२ यांची मुद्रा
सत्यमेव जयते



(१) आमचे वारसा हक्काची व मालकी व कबजा वहिवाटीची पोट तुकडी तालुका नाशिक, जिल्हा नाशिक, पैकी मौजे आडगांव गांव शिवारामधील, तसेच नासिक महानगरपालिका हद्दीतील शेतजमिन गट नंबर - ४६ यांसी क्षेत्र-० हेक्टर ५८ आर अधिक पोट खराबा ० हेक्टर ०२ आर यांसी एकूण क्षेत्र-० हेक्टर ६० आर यांसी आकार रूपये-१-६२ पैसे पडीत शेतजमिन मिळकत ही तुम्हांस या दस्त ऐवजाने एकूण रूपये-१,१४,००,०००/- (अक्षरी रूपये:-एक कोटी चौदा लाख मात्र ) ऐवजी घेवून कायमची खरेदी करून देत आहोत.

(२) **मिळकतीचे वर्णन व चतुसिमा:-**

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी, नाशिक महानगरपालिका हद्दीतील,मौजे " आडगांव " या गांवचे शिवारातील जिरायत शेतजमिन मिळकत यांसी गट नंबर-४६ यांसी क्षेत्र-० हेक्टर ५८ आर अधिक पोट खराबा ० हेक्टर ०२ आर यांसी एकूण क्षेत्र-० हेक्टर ६० आर यांसी आकार रूपये-१-६२ पैसे पडीत शेतजमिन मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस :- गट नंबर-४४.
पश्चिमेस :- गट नंबर-४५ मधील उर्वरीत क्षेत्र.
दक्षिणेस :- गट नंबर-४६.
उत्तरेस :- गट नंबर-४३.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत जल,तरू,काष्ट,पाषाण,निधी, निक्षेप तदंगभूत वस्तुंसह, तसेच मिळकतीमध्ये जाणे-येणेसाठी असलेले रस्ते वापरण्याचे हक्कांसह चतु:सिमेतील दरोबस्त मिळकत वागवहिवाटीचे व त्यामध्ये असलेले सर्व हक्कांसह दरोबस्त मिळकत या खरेदीखताचे दस्ताने तुम्हांस कायमची खरेदी देत आहे.

तसेच दस्ताचे सोयीसाठी हयापुढे हया खरेदीखतात लिहून घेणार यांचा उल्लेख तुम्ही/तुमचा व तुमची असा केलेला आहे तर लिहून देणार यांचा उल्लेख आम्ही, आमचा, आमचे असा केलेला आहे.

( पान नं.४ वर )

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR Class-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, यांची मुद्रा
सत्यमेव जयते
NASIK

नसन - २
दस्त क्र.(२२९) २००८
४ /२५

(३) सदरची मिळकत मुळ रामदास खंडू मते, मधुकर खंडू मते व इतर यांचे वारसाहक्कांची व मालकीची होती. त्यांनी जमिन महसूल कायदया अंतर्गत कलम ८५ अन्वये मे. तहसिलदार यांचेकडे वाटपासाठी अर्ज करून त्यांच्या मिळकती वाटप करून घेतल्या. या तहसिलदार यांचेकडे वाटपासाठी अर्ज करून त्यांच्या मिळकती वाटप करून घेतल्या. या तहसिलदार साहेब यांनी तसा आदेश दिनांक :- १७/८/१९८२ रोजी क्रमांक-टेनश्री / व.शि / XXX दिनांक :- १७/८/१९८२ अन्वये दिला व गट नंबर- ४६ खालील व्यक्तींच्या नांवे आला.

| गट नंबर | क्षेत्र | आकार | नांव |
|---|---|---|---|
| ४६ | ०-५८ | १-६२ | बबीबाई दिंगबर कड |
| | ०-०२ | | निवृत्ती हणमंता मते |
| ५३ | ०-३८ | ०-८४ | बबीबाई दिंगबर कड |
| | ०-०१ | | निवृत्ती हणमंता मते |

सदरप्रमाणे व्यवहाराची नोंद ६ ड क्रमांक-५५२ दिनांक:- X/९/१९८२ अन्वये झाली आहे.

त्यानंतर बबीबाई व निवृत्ती मते यांनी गट नंबर-४६ व गट नंबर ५३ यांची वाटणी करून घेतली व गट नंबर-४६ फक्त निवृत्ती हणमंता मते यांचे नांवे आला. सदर फेरफाराची नोंद क्रमांक-२६८१ दिनांक:- ३/५/१९९३ अन्वये झाली आहे. पुढे श्री.निवृत्ती हणमंता मते यांचे दिनांक- २८/४/१९९७ रोजी निधन झाले. त्यांचे वारस म्हणून त्यांची पत्नी तुळसीबाई निवृत्ती मते, मुले संजय, सुकदेव व यादव निवृत्ती मते यांची नांवे ७/१२ उताऱ्यास ६ ड नोंद क्रमांक- ३७८१ दिनांक :- १४/५/१९९७ अन्वये लागली आहेत.

श्रीमती. तुळशीबाई निवृत्ती मते व इतर यांनी सदर मिळकती संदर्भात श्री. योगेश बाळकृष्ण शिरापुरे यांना दिनांक- १४/५/९७ रोजी जनरल मुखत्यार पत्र लिहून दिले. सदर जनरल मुखत्यार पत्रावर दिनांक-२७/२३/२००३ रोजी योग्य तो मुद्रांक शुल्क भरून दिले आहे व त्या अधिकाराप्रमाणे श्री. योगेश बाळकृष्ण शिरापुरे या मिळकतीचे सर्व व्यवहार करणेचे पुर्ण अधिकार आहे व त्या अधिकाराचा वापर करून हे खरेदीखत लिहून नोंदवून देत आहे.

( पान नं.५ वर )

नासन - २
दस्त क्र.(२२८९) २००८
५ / ४५

(४) सदरची मिळकत ही नाशिक महानगरपालिकेच्या नागरी परिक्षेत्रात आहे व रहिवाशी विभागात समाविष्ठ झालेली आहे. आजुबाजुचे परिसरात नागरी वस्ती वाढत आहे. व या विभागाचा नागरी विकास होत आहे. त्यामुळे तेथे शेती करणे अवघड होत आहे. त्यामुळे ही शेत विकून येणाऱ्या किमंतीमधुन लिहून देणार हे इतरत्र शेती / मिळकत घेत आहेत. त्याचा उपभोग त्यांचे कूटूबियांना होईल. सदरचे मिळकत विक्रीचे हे एक कारण आहे.

(५) सदर मिळकत लिहून देणार यांचे कुटुंबाचे कायदेशिर गरजेकरीता व कुटूंबाचे हिताकरीता इतर व्यक्तीस विकण्याचे लिहून देणार यांनी ठरविले. सदर बाब लिहून घेणार यांना समजलेवरून सदर मिळकत विकत घेण्याची त्यांनी तयारी दर्शविली. त्याप्रमाणे उभयतांमध्ये व्यवहाराची बोलणी होवून सदर मिळकतीची एकुण उक्ती किमंत रक्कम रूपये-१,१४,००,०००/-(अक्षरी रूपये - एक कोटी चौदा लाख मात्र) इतकी देवू केली. सदर लिहून घेणार यांनी देवू केलेली किमंत ही चालू बाजारभावापेक्षा जास्त व वरचढ असल्याने लिहून देणार यांनी सदर मिळकती लिहून घेणार यांना कायमखुष खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले.

(६) सदरची मिळकत ही नाशिक महानगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेमध्ये रहिवाशी विभागात दर्शविलेली असून तसा दाखला नाशिक महानगरपालिका यांचेकडील पत्र क्रमांक- नामपा/न.र/झोन दाखला/पंच/१५०८ दिनांक-३०/१/२००८ अन्वये दिला आहे.

(७) तसेच सदर मिळकतीचे खरेदी विक्रीसाठी नाशिक महानगर पालिका, नाशिक यांचा ना हरकत दाखला घेण्यात आला असून त्याचा क्रमांक- नरवि/वशि/पंचवटी/१५०८/१/२००८ दिनांक :- ३०/१/२००८ असा आहे.

(८) नागरी जमिन कमाल मर्यादा धारणा कायदा १९७६ हा महाराष्ट्र शासनाने रद्दबादल ठरविला असल्याने तसेच सदरची मिळकत ही सदर कायदयाचे कक्षेबाहेर असल्याने सदरचा कायदयाच्या कोणत्याही तरतूदी या मिळकतीस लागू होत नाही.

( पान नं. ६ वर )

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR Class-2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-३, गांधी शिंदे (६)
सत्यमेव जयते

बारखा - २
दस्त क्र.(२२५९) २००८
६ / २५

(९) वर वर्णन केलेली मिळकत ही शासनाचे कोणत्याही प्रकल्पाने बाधीत होत नाही. सदर मिळकतीस पुनर्वसन अधिनियम १९८६ च्या तरतूदी लागू होत नाही.त्यामुळे सदर कायदयातील कलम १२ अन्वये परवानगीची आवश्यकता नाही.

(१०) सदर मिळकत लिहून देणार हे बिगर आदिवासी आहेत व सदरची मिळकत ही आदिवासींची जमिन नसल्याने त्यांस महाराष्ट्र जमिन महसूल आधिनियम १९६६ चे कलम ३६ अन्वये परवानगी घेणेची आवश्यकता नाही.

(११) तसेच सदर मिळकतीचे क्षेत्र प्रमाणभुत क्षेत्राचे(Standard area) तरतूदीत असल्याने मुंबई जमिन तुकडा प्रतिबंधक व एकत्रिकरण आधिनियम १९४७ नुसार परवानगीची आवश्यकता नाही.

(१२) लिहून देणार व लिहून घेणार यांचे नांवे महाराष्ट्र शेतजमिन अधिनियम १९६१ चे कमाल धारणेचे मर्यादेपेक्षा जास्त क्षेत्र नाही.

(१३) लिहून घेणार व लिहून देणार हे उभयंता दोघेही शेतकरी असल्याने कोणत्याही परवानगीची गरज नाही.सदरचा ७/१२ उतारा दस्तास जोडला आहे.

(१४) वर नमुद केलेल्या मिळकतीची एकूण किंमत तुमचे व आमचे मध्ये रूपये-१,१४,००,०००/-(अक्षरी रूपये-एक कोटी चौदा लाख मात्र) इतकी ठरली आहे. ती तुम्हांस व आम्हांस मान्य व कबूल आहे. बाजारभावाप्रमाणे बरोबर आहे. या किंमतीबाबत आमची कोणाचीही काहीही तक्रार नाही.

(१५) तुम्हांस फरोक्त खरेदी दिलेली ही मिळकत संपुर्णपणे निर्वेध असून तिच्यावर कोणाचाही काही एक बोजा अगर चार्ज नाही. सदर मिळकत गहाण,दान,लिन,लिज,बक्षिसपत्र,मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारच्या तबदिलीत अडकवलेली नाही.सदर मिळकतकोर्टाचे सरकार चेअथवा राष्ट्रीयकृत बॅंकेचे अगर इतर कोणाचेही चार्जमध्ये नाही अथवा तसा कोणाचाही हक्क नाही.सदरच्या मिळकतीवर कोणत्याही प्रकारचे कर्ज आम्ही काढलेले नाही. तश्या प्रकारची आम्हांस कोणाकडूनही, सरकारकडून अगर नगरपालिकेकडून अगर कोणत्याही सरकारी,निम..

(पान नबंर..७..वर)

SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR Class-2 NASIK
सत्यमेव जयते

नासक - २
दस्त क्र. ६२२९ ) २००८
८ / २५

-सरकारी अथवा खाजगी संस्थेकडून वा व्यक्तीकडून आजपावेतो कसलीही नोटीस आलेली नाही. तसा दावा कोणी केला नाही. सदर मिळकत संपुर्णपणे निर्वेध असल्याची तुम्ही संपूर्ण मालक झाला आहांत तुमचे सदरचे मिळकतीचे मालकी हक्कांस कोणीही हिल्ला हरकतकेल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे पदर खर्चाने करून देवू. तुम्हांस त्याची तोशिस लागू देणार नाही. आमचे पश्चात सदरचे निवारण आमचे वारसदार करून देतील.आमची खात्री आहे व तसे प्रतिज्ञेवर सांगत आहे. सदर मिळकतीचे त्यासाठी तुमचे काही नुकसान झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी आमचेवर राहील.अशी निर्वेध व निजोखमी मिळकत आम्ही लिहून देणार यांनी तुम्हांस आज रोजी या खरेदीखताने रक्कम रूपये-१,१४,००,०००/- ( अक्षरी रूपये- एक कोटी चौदा लाख मात्र) या मोबदल्यापोटी कायमखुश खरेदी दिली आहे.

(१६) वर कलम नंबर-१ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे खरेदी खतापावेताचे संपुर्ण चार्जेस व कर अगर इतर काही सरकारी देणे असल्यास ते लिहून देणार यांनी भरून दयाववयाचे आहे असून खरेदीखतानंतर येणारे सर्व कर चार्जेस व इतर देणे भरण्याची जबाबदारी ही लिहून घेणार यांची राहील. मात्र खरेदीखतापावेतो च्या कालावधीसाठी सदर मिळकती बाबत कुठल्याही प्रकारची थकबाकी अगर दंड यापुढे कधीही भविष्यांत आढळून आल्यास तो भरण्यांची संपूर्ण जबाबदारी लिहून देणार यांचेवरच राहील.

(१७) सदरहू जमिन मिळकतीचा प्रत्यक्ष खुला व निर्वेध कबजा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना आज रोजी या खरेदीखतापुर्वी प्रत्यक्ष मिळकतीत जावून मोजमापे घेवून हद्दीचे खुणा दाखवून दर्शवून दिला असून तो लिहून घेणार यांना मिळाला आहे. कबजा बाबत उभयतांची काहीएक तक्रार नाही. यापुढे सदरहू जमिन मिळकतीचा उपभोग लिहून घेणार यांनी मालकी हक्काने घ्यावा. त्यांस लिहून देणार अथवा त्यांचे वालीवारस हे कोणतीही हिल्ला हरकत करणार नाहीत. यदाकदाचित भविष्यांत लिहून घेणार यांना या खरेदीखताने प्राप्त झालेल्या मिळकतीच्या मालकी हक्कांस,कब्जे वहिवाटीस व उपभोगास कोणीही काहीही हिल्ला हरकत केल्यास त्याचे निवारण लिहून देणार हे त्यांचे पदरखर्चाने करून देतील त्याची तोशिष लिहून घेणार यांना लागू देणार नाहीत.

(पान नंबर..८..वर)

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, यांची मुद्रा
सत्यमेव जयते
NASIK

नासक - २
दस्त क्र. ६२२९ ) २००८
८ / २५

(१८) येणेप्रमाणे आज पासून तुम्ही वर कलम १ यांत वर्णन केलेल्या तुम्हांस दिलेल्या मिळकतीचे पूर्णपणे कायदेशीर मालक झालेले आहांत. सदरचे खरेदीखत आमचे व आमचे पश्चात आमचे कुटूंब व वालीवारसावर बंधनकारक राहील.

(१९) सदरहू मिळकतीचे बाबत कोणत्याही कोर्टासमोर, रेव्हेन्यु ॲथॉरीटीसमोर अगर अन्य सक्षम अथॉरीटी समोर वाद प्रलंबित नाही. तसेच सदरहू जमिन मिळकत त्यांचे आदेशाने बाधीत झालेली नाही. मिळकतीचे हस्तांतरणावर त्यांचे आदेशाने मनाई नाही. कोणाही व्यक्तीने अगर संस्थेने सदरहू मिळकतीबाबत वाद उपस्थित केलेला नाही असे लिहून देणार हे भरवशांने लिहून देत आहेत. यदा कदाचित भविष्यांत मिळकतीबाबत कोणताही वाद आढळून आल्यास अगर कोणीही काहीही वाद उपस्थित केल्यास त्याचे निवारण लिहून देणार हे त्यांचे पदरखर्चाने करून देतील, त्याची तोषित लिहून घेणार यांना लागू देणार नाहीत.

(२०) सदरहू मिळकत ही आजपावेतो कोणत्याही सरकारी, निम सरकारी अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेने कोणत्याही सार्वजनिक कामाकरीता ॲक्वायर अगर रिक्वॉयर केलेली नाही. तसेच तशा नोटीसाही लिहून देणार यांना मिळालेल्या नाहीत व संबंधीत कार्यालयाने देखिल त्या काढलेल्या नाहीत. सदरहू शेतजमिन मिळकत कोणत्याही कारणासाठी आरक्षित नाही. तसेच रस्त्याचे रूंदीकरणाने बाधीत होत नाही असे लिहून देणार हे भरंवशाने लिहून देत आहेत.

(२१) सदरचे जागेचा आजपावेतो शेतसारा व टॅक्सेस आम्ही भरलेले असून या पुढील सर्व शेतसारा व टॅक्सेस तुम्ही तुमचे भरावयाचे आहेत. त्याबाबींशी आमचा कोणताही संबंध राहाणार नाही.

(२२) सदरहू खरेदीखताचा संपूर्ण खर्च म्हणजेच स्टॅम्प, टायपींग, वकील फी, नोंदणी फी व इतर अनुषंगिक सर्व खर्च हा लिहून घेणार यांनीच केलेला आहे.

(पान नंबर..९..वर)

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नासिक-२, यांची मुद्रा
सत्यमेव जयते

नसन - २
दस्त क्र. (६२८९) २००८
८ / २५

(२३) सदरहू शेतजमिन मिळकतीचे अनुषगाने येणारे आज तारखेपर्यन्त चे सर्व शासकीय, निमशासकीय व म्युनिसिपल तसेच बिनशेती कर सेस व इतर टॅक्सेस हे लिहून देणार यांनी भरलेले असून येथुनपुढे सदर रक्कमांचा भरणा लिहून घेणार यांनी करावयाचा आहे. यदाकदाचित भविष्यांत सदर शेतजमिन मिळकतीचे बाबत आज तारखेपुर्वीची काहीएक थकबाकी आढळून आल्यास त्याचा भरणा लिहून देणार हे त्यांचे पदरखर्चाने करून देतील.त्याची तोषिश तुम्हांस म्हणजेच लिहून घेणार यांना लागू देणार नाहीत.

(२४) सदरहू शेतजमिन मिळकत ही लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना कायमस्वरूपी खरेदी दिली आहे. खरेदीचा व्यवहार हा लिहून देणार व त्यांचे वालीवारसावर बंधनकारक राहील.

(२५) सदर मुळ खरेदीखत मे. दुय्यम निबंधकसाहेब, नासिक यांचे कडे नोंदवित आहोत व त्याची नक्कल तसेच इतर आवश्यक पत्रे इत्यादी तुम्हांस भोगवटयासाठी देत आहोत.

(२६) सदरहू जमिन मिळकतीचे लिहून घेणार हे या खरेदीखताने मालक झालेले आहेत.७/१२ चे उता-यांवर रेकॉर्ड ऑफ राईटसला कब्जेदार सदरी लिहून घेणार यांचे नांव लावून घेणेचे आहे.देतील. यासाठी लिहूनदेणार हे आवश्यक ते सहकार्य करतील,तसेच आवश्यक त्यासर्व कागदोपत्री पूर्तताप्रसंगी संबंधीत कार्यालयात हजर राहून करून देतील.

(२७) तसेच सदर जमिन मिळकतीचा ताबा तुम्हांस खरेदीचे दस्त करते वेळी दिला आहे,सदर जमिनीमध्ये असलेले इतर निर्जीव वस्तुंसह,तसेच दगडधोंडे,सद्यस्थितीत ज्या परिस्थितीमध्ये सदर जमिन मिळकत आहे त्याच परिस्थिती मध्ये सदरच्या जमिनीचा ताबा दिला आहे.

(२८) **<u>भरण्याचा तपशिल</u>:-**

वर वर्णन केलेल्या मिळकतीच्या किमंतीचा संपुर्ण भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालीलप्रमाणे दिला आहे.

(पान नबंर..१०.वर)

सत्यमेव जयते NASIK

नसन - २

दस्त क्र.(७२८९) २००८

१० / २५

| रूपये- | तपशिल |
|---|---|
| रूपये-४८,००,०००/- | (अक्षरी रूपये - आठ्ठेचाळीस लाख मात्र ) दिनांक-१८/१०/२००७ रोजी बॅक ऑफ महाराष्ट्र, एरंडवना ब्रॅन्च, पुणे चा चेक नंबर-७३६८८१ ने व दिनांक-१६/०१/२००८ रोजी चेक नंबर - १८४१५० ने श्री. योगेश बाळकृष्ण शिरापूरे यांचे नांवे दिले ते पावले. |
| रूपये-२६,००,०००/- | (अक्षरी रूपये-सव्वीस लाख मात्र ) दिनांक-२६/०२/२००८ रोजी बॅक ऑफ महाराष्ट्र, एरंडवना ब्रॅन्च,पुणे चा चेक नंबर-७८२२१४ ने श्री. योगेश बाळकृष्ण शिरापूरे यांचे नांवे दिले ते पावले. |
| रूपये-४०,००,०००/- | (अक्षरी रूपये-चाळीस लाख मात्र) दिनांक-०५/०३/२००८ रोजी बॅक ऑफ महाराष्ट्र, एरंडवन्ना ब्रॅन्च,पुणे चा चेक नंबर-७८२२२३ ने श्री. योगेश बाळकृष्ण शिरापूरे यांचे नांवे दिले ते पावले. |

**एकूण रूपये-१,१४,००,०००/-**-(अक्षरी रूपये-एक कोटी चौदा लाख मात्र)

वरीलप्रमाणे किमंतीची संपूर्ण रक्कम लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून मिळाली आहे. भरण्याबाबत लिहून देणार यांची काहीएक तक्रार नाही. लिहून देणार यांना लिहून घेणार यांचेकडून सदरहू जमिन मिळकतीचे किमंतीपोटी काहीही येणे बाकी नाही.

(२९) सदर मिळकतीवर श्री. योगेश बाळकृष्ण शिरापुरे यांनी गोदावरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅक लि. नाशिक यांचेकडून कर्ज घेतले होते. व त्या कर्जापोटी सदरची मिळकत नोंदणीकृत गहाण खताने गहाण दिली होती. सदरचे मिळकतीवरील या कर्जाचा बोजा कमी करण्यांत आला असून गहाणमूक्त दस्तऐवज मा. दुय्यम निबंधकसाहेब, नाशिक-३ यांचेकडे दिनांक-२१/२/२००८ रोजी दस्तक्रमांक- ०१८३० ने नोंदविला आहे व त्या अनुषंगाने उताऱ्या वरील बोजा कमी करण्यांत आला आहे.

(पान नबंर..११.वर)

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, गांधी मुद्रा
सत्यमेव जयते

नसन - २
दस्त क्र. (६२८९) २००
९१ / ९५

(३०) वरीलप्रमाणे सर्व भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिला तो लिहून देणार यांना मिळाला व पावला असून भरण्याबाबत आता कोणतीही तक्रार राहीलेली नाही. सबब वेगळे भरणा पावतीची आवश्यकता नाही.

(३१) लिहून देणार असे जाहिर करतात की, सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार उभयपक्षांनी संमतीने केला आहे. आता लिहून देणार यांचा सदर मिळकती अथवा त्यांच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क अधिकार राहणार नाही. तसेच लिहून देणार यांचे वालीवारस देखील त्यावर कोणताही हक्क अधिकार सांगणार नाही. लिहून देणार असेही जाहिर करतात की, त्यांनी सदर मिळकतीबाबत इतर कोणाही बरोबर व्यवहार करार,मदार केलेला नसून लिहून देणार यांना सदर मिळकतीमध्ये कोणताही हक्क अधिकार राहीलेला नाही.

(३२) या खरेदीखताचे दस्ताबरोबर खालील महत्वाचे कागदपत्रे तुमचे भोगवटयासाठी तुम्हांस सुपूर्द करीत आहोत.

अ) ७/१२ उतारा.
ब) नोंदीचे उतारे.
क) मिळकतीचा नकाशा.
ड) रहिवाशी विभागात असल्याचा नासिक महानगरपालिकेचा दाखला
इ) मिळकत खरेदीविक्री साठी नाशिक महानगरपालिका यांचा ना हरकत दाखला.

(३३) सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र-६००० चौ.मी. म्हणजेच ६० आर यामध्ये खरेदी घेणार यांचे पुढील तपशिलाप्रमाणे हिस्सा राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.शामकांत केशव कोटकर | (३२) | १,९००-०० चौ.मी. (० हेक्टर १९-० आर) |
| २) | श्री. गणेश निम्बा शिरोडे | (५०) | ३,०००-०० चौ.मी. (० हेक्टर ३०-० आर) |
| ३) | श्री. राकेश रमेश मिरजे | (१८) | १,१००-०० चौ.मी. (० हेक्टर ११-० आर) |

येणेप्रमाणे हिस्से खरेदीखताने कायम केले आहेत. त्याबाबत कोणाचीही काहीएक हरकत नाही.

(पान नबंर.१२.वर)

नक्कल - २

दस्त क्र.६०२९ ) २००८

१२ / २५

(३४) येणेप्रमाणे सदरचे कायमचे फरोक्त खरेदीखत लिहून देणार यांनी राजीखुशीने व स्वसंतोषाने समजून उमजून लिहून दिले असून साक्षीदारांचे समक्ष सही करून नोंदवून दिले आहे.

हे कायमचे फरोक्त खरेदीखत.

(१)श्रीमती.तुळसाबाई भ्र.निवृत्ती मते
(२) श्री. संजय निवृत्ती मते,
(३) श्री. सुकदेव निवृत्ती मते,
(४) श्री. यादव निवृत्ती मते,
क्रमांक-१ ते ४ यांचे जनरल मुखत्यार म्हणून
श्री. योगेश बाळकृष्ण शिरापुरे,
(लिहून देणार)

(१) श्री. शामकांत केशव कोतकर,

(२) श्री. गणेश निंबा शिरोडे,

(३) श्री. राकेश रमेश मिरजे,
(लिहून घेणार)

साक्षीदार:-

१. Sandip Sathe

२.

नक्कल करिता

**गां. न. नं. ७, ७अ, व १२**

गांव आडगांव - २
ता. जि. नाशिक

| भूमापन क्रमांक | हिं.क्र. | धारणा प्रकार | गां. नं. क्र. ७ | खाते क्रमांक ९२८ ९३०२ दस्त क्र. (८८९) २००८ |
|---|---|---|---|---|
| ४६ | ओफ्ली | खा | भोगवटदाराचे नाव | |
| भू.क्र.क्रमांकाचे स्थानिक नाव | — | | (७) (३३०) (५५१) (८८९) | कुळाचे नाव — खंड ८/२५ |
| लागवडी योग्य क्षेत्र | ~~एकर~~ | ~~गुंठे~~ | तुळसाबाई श्र निवृत्ती मते | |
| | हेक्टर | आर | संजय निवृत्ती मते | |
| | ~~चौरस~~ | ~~मिटर~~ | सुकदेव निवृत्ती मते | |
| जिरायत - | ०-५८ | | माधव निवृत्ती मते | इतर अधिकार (७) गुंठा |
| बागायत - | | | (८८०९) | गोदावरि अर्बन को ऑप बैंक लि नाशिक हि रु २२,५०,०००-१२/१०/०६ योगेश बाळकृष्ण शिरपुरे करिता (८३७६) |
| भात शेती - | | | | |
| एकूण- | ०-५८ | | | |
| पो. ख. - | ०-०२ | | | |
| वर्ग (अ) - | | | | |
| वर्ग (ब) - | | | | |
| एकूण- | ०-६० | | | |
| आकार बिनशेती- | रूपये ९ | पैसे ६२ | | |
| जुडी किंवा विशेष - | | | | |
| आकार पाण्याबाबत- | | | | |
| एकूण- | ९ | ६२ | | |

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK — सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, गांधी पुरी — सत्यमेव जयते

| गां.नं. क्र. ७ अ | | | | गां.नं. क्र. १२ | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पिकाखालील क्षेत्र | | | | | | | | | पडीत पिकास निरूपयोगी जमिनीचा तपशील | | | |
| | | | | मिश्र पिकांचे एकूण क्षेत्र | | | मिश्र पिकातील प्रत्येक पिकाचे क्षेत्र | | | अ मिश्र पिकाचे क्षेत्र | | | | | | |
| वर्ष | जमीन कसणाऱ्याचे नांव | रीत | हंगाम | मि. पी. संकेतांक | जलसिंचित | अजलसिंचित | पिकाचे नाव | जलसिंचित | अजलसिंचित | पिकाचे नांव | जलसिंचित | अजलसिंचित | प्रकार | क्षेत्र | पाणी पुरवठ्याचे साधन | शेरा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| २००७ २००८ | खु | | | | | | | | | सोयाबीन ०-५८ | | | | | | |

नक्कल फी

अस्सल प्रमाणे खरी नक्कल तयार ता. 31 JAN 2008

तलाठी आडगांव
ता. जि. नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक.

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, पोस्ट बॉक्स. १२, नाशिक – ४२२ ००२.

Visit us at : www.nashikcorporation.com E-mail : eeplanning@dataone.in


नगररचना विभाग

जा.नं/नरवि/वशि/पंचवटी/९५०८/१/२००८.

दिनांक ३०/ ०१ /२००८.

नासक - २

दस्त क्र.(४२५९) २००८

१४ /२५

प्रति,

श्री. संजय निवृत्ती मते व इतर

नाशिक.

विषय:- खरेदी/विक्रीसाठी नाहरकत दाखला मिळणेबाबत..

संदर्भ:- आपला दिनांक २९/०१/२००८ चा अर्ज..

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये दाखला देण्यात येतो की, नाशिक महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेच्या आराखडयात मौजे आडगांव शिवारातील गट नं. ४६ ही जमिन रहिवासी विभागात समाविष्ट असुन पुर्व बाजू १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या प्रस्तावाने बाधीत होते.

तरी गट नं. ४६ च्या ७/१२ उताऱ्यावरील क्षेत्राच्या सर्व कायदेशिर बाबींची आपल्या स्तरावर पुर्तता करुन खरेदी/विक्री करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK

सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, पंचवटी मुद्रा

सत्यमेव जयते

कार्यकारी अभियंता

नगररचना विभाग

नाशिक महानगरपालिका,नाशिक.


पी.बी. एक्स : २५७५६३१, २५७५६३२, २५७५६३३, २५७५६३४, २५७७९२१, २५७७९२३, २५७१४७९, २५७१८७२, २५७७९५२, २३१५९६७, २५८१२५२ ▮ फॅक्स : (०२५३) २५७७९३६, २३१५७०४

# नाशिक महानगरपालिका कार्यालय, नाशिक

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK सत्यमेव जयते

जा. नं. : नामपा / न.र. / झोन दाखला / पंच/१५०८

दिनांक :३० / ०७ / २००८

| नमुना - २ |
|---|
| दस्त क्र. (७२५७) २००८ |
| १५ / २५ |

प्रति,

श्री. / ~~श्रीमती~~ संजय निवृत्ती मते.
आडगांव.
नाशिक.

**विषय : झोनिंग दाखला मिळणेबाबत.**

**संदर्भ : आपला दिनांक २९ / ०७ / २००८ चा अर्ज.**

महोदय / महोदया, (डि. पी. शिट नं. ११)

१) नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे आडगांव शिवारातील ~~सि. स.~~ नं. / ~~स. नं.~~ / गट नं. – ४६ – ~~मधील अंतिम भूखंड क्रमांक~~ — ~~नगररचना योजना नाशिक क्र. ९/२~~ ही जमीन नाशिक महानगरपालिका क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार —

सदर जमीन रहिवाशी विभागात समावेश असुन पुर्व बाजु १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या प्रस्तावाने बाधीत होते.

सहाय्यक संचालक, नगररचना ( करिता )
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नासिक-२, यांची मुद्रा
SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 NASIK
सत्यमेव जयते

नमुना - २

दस्त क्र. (६२५९) २००८

१८ / २५

# घोषणापत्र

मी मोहम्मद आबूबकर मिरचंदू सादर घोषित करतो/करते की, मे.सह दुय्यम निबंधक साहेब, वर्ग-२, नाशिक यांचे कार्यालयात खरेदीखत, या शिर्षकाचा दस्त नोंदणीसाठी सादर करण्यात आला आहे. श्री. मुकुंदभाई मिसलीमन व इतर यांनी दिनांक ७/१/१५/०८ रोजी मला दिलेल्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे मी सदर दस्त नोंदणीस सादर केला आहे / निष्पादीत करून कबुली जबाब दिला आहे. सदर कुलमुखत्यारपत्र लिहून देणार यांनी कुलमुखत्यारपत्र रद्द केलेले नाही किंवा कुलमुखत्यारपत्र लिहून देणार व्यक्तींपैकी कोणीही मयत झालेले नाही किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कुलमुखत्यारपत्र रद्दबातल ठरलेले नाही. सदरचे कुलमुखत्यारपत्र पूर्णपणे वैध असून उपरोक्त कृती करण्यास मी पूर्णतः सक्षम आहे. सदरचे कथन चुकीचे आढळून आल्यास, नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये शिक्षेस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे.

हे घोषणापत्र लिहून दिले असे.

दिनांक : ५/३/०८ कुलमुखत्यारपत्र धारकाचे नांव व सही

मी श्री. मोहम्मद आबूबकर मिरचंदू व इतर स्वतः/यांनी सदरचे कुलमुखत्यारपत्र वैध असल्याबाबतची खातरजमा केलेली असून या दस्तऐवजामध्ये कुलमुखत्यारपत्रधारक म्हणून सही करणार हे स्वतः आहेत.

दिनांक : ५/३/०८ लिहून देणार

100Rs.

INDIA NON JUDICIAL

१०० रु. Rs 100

सत्यमेव जयते
भारत

एक सौ रुपये ONE HUNDRED RUPEES

JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK
सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नासिक

Impounded under Sec. 31 of the B. S. Act. 1958

Collector of Stamps Nasik

ARUN NARAYANRAO SAVANT NOTARY Govt. of Maharashtra NASIK

CANCELLED

॥ श्री स्वामी समर्थ ॥

: कधीही रद्द न होणारे जनरल मुखत्यार पत्र :

जनरल मुखत्यार पत्र आज तारीख ११ माहे मे इसवी सन १९७७ रोज बुधवार रोजी नाशिक मुक्कामी...

| | |
|---|---|
| श्री. रोहित बाळकृष्ण शिरसाठे<br>उ. व. २० वर्षे, धंदा - शेती व व्यापार,<br>रा. आ. ११२, मेघदूत शॉपिंग सेंटर,<br>शिवाजीरोड, नाशिक. | लिहून घेणार |

- यांसी -

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती सुशिलाबाई भ्र. निवृत्ती मते,<br>उ. व. ४०वर्षे, धंदा - शेती व व्यापार, | लिहून देणार |
| २. | श्री. संजय निवृत्ती मते,<br>उ. व. २२, धंदा - शेती, | |
| ३. | सुभाष निवृत्ती मते,<br>उ. व. २१ वर्षे, धंदा- शेती, | |

..२..

नसल - २
लिहून देणार ) २००८
दस्त क्र. २२५९
१९ / २५

श्री. यादव निवृत्ती मते
उ.व. १९ वर्षे, धंदा - शेती,
सर्व राहणार - आडगांव, ता. जि. नाशिक

कारणे जनरल मुखत्यार पत्र लिहून देतो ऐसा जे की...

१... प्रस्तुत दस्ताचे कलम २ यात वर्णन केलेली मौजे आडगांव येथील स्थावर मिळकत शेत जमिन, निवासी विभागता समाविष्ट असलेली मिळकत तसेच महानगरपालिका हद्दीतील मिळकत आमचे वडिलोपार्जीत मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीतील व मालकीची उपभोगातील मिळकत आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्यावर आज रोजी निवृत्ती हनुमंता मते यांचे नांव आहे. ता. २८.४.९७ रोजी ते मयत झालेले असून त्यांना आम्ही लिहून देणार वारस आहोत. [illegible] गांव कामगार तलाठी, आडगांव यांच्याकडे वारस म्हणून आमची नांवे लागण्यासाठी आम्ही यापूर्वीच रितसर अर्ज केलेला आहे. निवृत्ती मते यांनी ता. १९.२.९७ रोजी तुमचे लाभांत उपरोक्त मिळकती संबंधाने व्यवहार ठरवून तुमचे लाभात दस्त लिहून दिलेले आहेत. त्याची आम्हांस संपुर्ण माहिती आहे. त्यांचा मृत्यू झाल्याने हे अलाहिदा जनरल मुखत्यार पत्र आम्ही तुमचे लाभांत लिहून दिलेले असून प्रस्तुत दस्तात लिहून देणार यांना "आम्ही" व लिहून घेणार यांना "तुम्ही" असे संबोधण्यात आलेले आहेत.

२] <u>मिळकतीचे वर्णन</u> :- तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी मौजे आडगांव शिवारांतील तसेच नासिक महानगरपालिका हद्दीतील तसेच सिलींग हद्दीबाहेरील आडगांव येथील गट नं. ४६ यांसी क्षेत्र हे. ००.६० आर ह्यांसी आकार रुपये १.८२ पैसे ह्यांसी चतुःसिमा खालील प्रमाणे

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK

पुर्वेस : गट नं. ६७,

पश्चिमेस : गट नं. ४७ व ४९

दक्षिणेस : गट नं. ४५१

उत्तरेस : गट नं. ४४ व ४५

दस्त क्र. ...२००८ २० /२५

येणे प्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत त्यात असलेले जल, तरु,काष्ट,पाषाण, निधी निक्षेपासह संपुर्ण मिळकत दरोबस्त.

३] ~~उपरोक्त मिळकत आम्ही तुम्हांस ...~~ आम्हांस वरीलप्रमाणे कामे करावी लागणार आहेत. आमचे शेती व्यवसायामुळे सदरची कामे एकत्रितपणे करणे जमणार नाही. सबब आम्ही तुम्हांस आमचे कुलमुखत्यार नेमले असून प्रस्तुतचा दस्त तुमचे लाभात लिहून दिलेला आहे.

mok Sanjay Nivrutti

४] उपरोक्त मिळकती संबंधाने तुम्हीं खालील प्रकारे कामे करावयाची आहे. त्यासाठी तुम्हांस संपुर्ण प्रकारे कामे करण्याचे हक्क व अधिकार आहेत व राहतील त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :-

हक्क व अधिकार :-

१. उपरोक्त मिळकतीची देखभाल करणे, शेतसारा भरणे.

२. उपरोक्त मिळकतीची सरकारी खाजगी मोजणी करणे, मोजणीचा नकाशा घेणे, त्याची फी भरणे ई.

३. उपरोक्त मिळकती संबंधाने सर्व रेव्हेन्यू रेकॉर्ड नोंदणे त्यासाठी अर्ज देणे, फी भरणे ई.

४. उपरोक्त मिळकतीचा ले-आऊट तयार करणे, तो नाशिक महानगरपालिकेचा टाऊन प्लॅनिंग ॲथॉरिटीकडून मंजूर करून घेणे.

ARUN NARAYANRAO ... NOTARY NASIK

महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम ४४ प्रमाणे उपरोक्त मिळकत बिनशेतीकडे वर्ग करणे घेणे, मे. कलेक्टर सो. नासिक यांचे कार्यालयात त्यासाठी रितसर अर्ज देणे, त्यावर सह्या करणे, प्रपत्र करारनामा करून देणे, रूपांतरीत कर भरणे, व बिनशेती परवानगी घेणे, इ.

दुय्यम निबंधक नाशिक - २
दस्त क्र. (२२९) २००
२१ / २५

६. बिनशेती परवानगी मिळालेनंतर सदर ले-आऊट अंतिमरित्या नाशिक महानगरपालिकेच्या टाऊन प्लॅनिंग ऑथॉरिटीकडून मंजूर करवून घेणे, तत्पूर्वी मिळकतीवर रस्ते लाईट, ओपन स्पेस इ. ची सोय करणे, ते नाशिक महानगरपालिकेच्या ताब्यात देणे, त्याप्रमाणे रिमार्केशन करणे, फी भरणे, डेव्हलपमेंट चार्जेस भरणे इ.

७. उपरोक्त मिळकतीच्या मंजूर ले-आऊट प्रमाणे मिळकतीचे ७/१२ उतारे प्लॉटप्रमाणे अलग, तुटक व स्वतंत्र करून घेणे, त्यासाठी मे. तलाठी, आडगांव यांचेकडे अर्ज देणे, त्यावर सह्या करणे.

८. उपरोक्त मिळकत किंवा तिचा कोणताही भाग, प्लॉट/फ्लॅटस् विक्री करणे त्यासाठी ति-हाईत इसमांबरोबर बोलणी करणे, इच्छुक ग्राहकांबरोबर किंमत निश्चित करणे वाटाघाटी करणे, त्यांचेकडून किंमती पोटी रकमा स्विकारणे, त्यांचे लाभात साठेखत, खरेदीखत लिहून देणे, आवश्यकता भासेल त्याप्रमाणे मे. दुय्यम निबंधक सो. यांचे कार्यालयात सदर दस्तावर सह्या करणे ते नोंदवून देणे, तेथील रजि. सह्या करणे, आम्ही समक्ष हजर राहून देत असता अशी सर्व कामे करणे.

९. उपरोक्त मिळकतीचे संरक्षण करतांना कोणी हरकत हल्ला केल्यास त्यांचे विरूद्ध योग्य त्या दिवाणी, फौजदारी किंवा मुलकी न्यायालयात दावे करणे, तक्रारी करणे, आमचे विरूद्ध कोणी कारवाई केल्यास त्याचे फिर्यादीवर जबाब देणे, ई. वकील बॅरिस्टर नेमणे त्यांची फी देणे, इ. वकीलपत्र देणे, बचाव करणे,

..५..

खालचे कोर्टापासून अखेरचे कोर्टापर्यन्त तुम्ही आमचे वतीने व आमचे साठी कामे पहाणे व मिळकतीचे संरक्षण करणे.

१०. उपरोक्त मिळकती संबंधी प्रस्तूत दस्त्यावरुन तुम्हांस प्राप्त असलेल्या हक्क व अधिकारान्वये तुम्ही अन्य त्रयस्थ इसमांस अगर नविन मुखत्यारास नेमू शकता त्यास आमचे संमती आहे व राहील. अशा मुखत्यारांनी तुमचे बरोबर केलेल्या एकत्रित व संयुक्त कामे तसेच प्रथकरित्या केलेली कामे व त्यांचे परिणाम व दस्तऐवजे आमचेवर बंधनकारक असतील व रहातील.

उपरोक्त मिळकती संबंधाने तुम्ही जी जी कामे कराल व जे जे दस्तऐवज लिहून धाल ते सर्व आम्ही समक्ष हजर राहून लिहून दिलेली केलेली आहेत असे समजण्यात येईल.

| | |
|---|---|
| दुय्यम | - २ |
| दस्त क्र. (२२८९) २००८ | |
| २२ / २५ | |

हे मुखत्यार पत्र आम्ही कधीही रद्द करणार नाही.

हे मुखत्यार पत्र आम्ही आमचे स राजीखुषीने लिहून दिलेले



लिहून देणार

१. ________ [signature]
[श्रीमती तुळसाबाई भ्र. नि. मते]

२. Mate Sanjay Nivrutti
[श्री. संजय निवृत्ती मते]

३. ________ [signature]
[श्री. सुखदेव निवृत्ती मते]

४. ________ [signature]
[श्री. यादव निवृत्ती मते]

उपरोक्त व्यक्तींनी माझे समक्ष अंगठे/सह्या केल्या

________________________

ॲडव्होकेट.

BEFORE ME
A. N. SAVANT
ADVOCATE & NOTARY
... MAHARASHTRA STATE

A/mo4/22/1997
Noted and Registered at Serial Number

CERTIFICATE

CERTIFIED that Shri Y. B. Shirsathe ...... has credited an amount of Rs. 133201/- on account of deficit Stamp duty and Rs. 106501/- only on account of penalty into the Govt. Treasury Nashik in 25.3.03 challan No. 97

The document is therefore certified as properly stamped under section 41 of the Bombay Stamp Act, 1958. Sub to the provi. U/s 53 A of B.S. Act 1958

Collector of Stamps, Nashik

Nashik

27.3.2003

---

& CO.

DATE 03/03/2008

9 8 7 6 5 4 8 2 1

FOR AN AMOUNT BELOW Rs.*******30001/-

ON DEMAND PAY JOINT SUB REGISTRAR CLASS II NASHIK******************

************************************************ OR ORDER

THIRTY THOUSAND ONLY

Rs.****30000.

FOR VALUE RECEIVED

| एह OT | दह TT | एल OL | दला TL |
|---|---|---|---|

For VISHWAS CO-OPERATIVE BANK LIMITED

Authorised Signature    Authorised Signature

VALID FOR SIX MONTHS FROM THE DATE OF ISSUE

विश्वास को-ऑप. बँक लि. नाशिक

VISHWAS CO-OP. BANK LTD., NASHIK

H. P. T. College Road, Branch, Swapnavaibhav, Adwait Colony, Canada Corner, College Road, Nashik 422 005. (Maharashtra) Telefax : (0253) 2305613.

HPC

R.N.& Co.

⑈069488⑈ 422504005⑆ 12

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK

सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२, गांधी मुद्रा

सत्यमेव जयते

नासन - २

द.स्त क्र. (2269) 2008

23 / 29

05223

28/1/07

दस्त गोषवारा भाग-1

28724

[?]5/03/2008 दुय्यम निबंधकः

[?]:06:23 pm नाशिक 2

दस्त क्रमांक : 2281/2008

दस्ताचा प्रकार : अभिहस्तांतरणपत्र

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नावः शामकांत केशव कोतकर रा 1 स्वागत देवशांती प्रभात रोड गल्ली नं 13 पुणे वय 38 - -<br>पत्ताः घर/फ़्लॅट नंः -<br>गल्ली/रस्ताः -<br>ईमारतीचे नावः -<br>ईमारत नंः -<br>पेठ/वसाहतः -<br>शहर/गावः-<br>तालुकाः -<br>पिनः | लिहून घेणार<br>वय -<br>सही |  |  |
| 2 | नावः गणेश निंबा शिरोडे रा मु पो कोपरगांव जि अ.नगर वय 37 - -<br>पत्ताः घर/फ़्लॅट नंः -<br>गल्ली/रस्ताः -<br>ईमारतीचे नावः -<br>ईमारत नंः -<br>पेठ/वसाहतः -<br>शहर/गावः-<br>तालुकाः -<br>पिनः -<br>पॅन नम्बरः - | लिहून घेणार<br>वय -<br>सही |  |  |
| 3 | नावः राकेश रमेश मिरजे रा रैना बंगलो शिवाजी नगर दक्षिण सांगली वय 39 - -<br>पत्ताः घर/फ़्लॅट नंः -<br>गल्ली/रस्ताः -<br>ईमारतीचे नावः -<br>ईमारत नंः -<br>पेठ/वसाहतः -<br>शहर/गावः-<br>तालुकाः -<br>पिनः -<br>पॅन नम्बरः | लिहून घेणार<br>वय -<br>सही |  |  |
| 4 | नावः खालील लि दे नं 1 ते 4 यांचे जमु म्हणुन श्री योगेश बाळकृष्ण शिरापुरे रा बी-212 मेघदुत शॉपिंग सेंटर नाशिक वय 38 - -<br>पत्ताः घर/फ़्लॅट नंः -<br>गल्ली/रस्ताः -<br>ईमारतीचे नावः -<br>ईमारत नंः -<br>पेठ/वसा | लिहून देणार<br>वय -<br>सही |  |  |
| 5 | नावः 1. श्रीमती तुळसाबाई भ्र निवृत्ती मते 2.संजय निवृत्ती मते 3.सकुदेव निवृत्ती मते 4.यादव निवृत्ती मते - -<br>पत्ताः घर/फ़्लॅट नंः -<br>गल्ली/रस्ताः -<br>ईमारतीचे नावः -<br>ईमारत नंः -<br>पेठ/वसाहतः -<br>शहर/गाव | लिहून देणार<br>वय -<br>सही | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 NASIK-2

दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२



दस्तऐवज करुन देणार तथाकथीत [अभिहस्तांतरणपत्र] दस्तऐवज करुन दिल्याचे कबूल करतात.

दस्त क्रमांक (2281/2008)

25/25

दस्त क्र. [नसन2-2281-2008] चा गोषवारा
बाजार मुल्य :11625000 मोबदला 11400000 भरलेले मुद्रांक शुल्क : 581250

दस्त हजर केल्याचा दिनांक :05/03/2008 04:59 PM
निष्पादनाचा दिनांक : 03/03/2008
दस्त हजर करणा-याची सही :

दस्ताचा प्रकार :25) अभिहस्तांतरणपत्र
दस्त अनुच्छेद प्रकार: (25-ब) पुढील हद्दीत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर

शिक्का क्र. 1 ची वेळ : (सादरीकरण) 05/03/2008 04:59 PM
शिक्का क्र. 2 ची वेळ : (फ़ी) 05/03/2008 05:03 PM
शिक्का क्र. 3 ची वेळ : (कबुली) 05/03/2008 05:05 PM
शिक्का क्र. 4 ची वेळ : (ओळख) 05/03/2008 05:05 PM

दस्त नोंद केल्याचा दिनांक : 05/03/2008 05:05 PM

पावती क्र.:2281 दिनांक:05/03/2008
पावतीचे वर्णन
नांव: शामकांत केशव कोतकर रा 1 स्वागत देवशांती प्रभात रोड गल्ली नं 13 पुणे वय 38 - -

30000 :नोंदणी फी
500 :नक्कल (अ. 11(1)), पृष्टांकनाची नक्कल (आ. 11(2)), रुजवात (अ. 12) व छायाचित्रण (अ. 13) -> एकत्रित फ़ी

30500: एकूण

सह दुय्यम निबंधकाची सही, नाशिक 2
नाशिक-२

ओळख :
दुय्यम निबंधक यांच्या ओळखीचे इसम असे निवेदीत करतात की, ते दस्तऐवज करुन देणा-यांना व्यक्तीशः ओळखतात, व त्यांची ओळख पटवितात.
1) ॲड विश्वास तुकाराम चौगुले रा 24 आनंद बाजार ना.रोड- - ,घर/फ़्लॅट नं: -
गल्ली/रस्ता: -
ईमारतीचे नावः -
ईमारत नं: -
पेठ/वसाहत: -
शहर/गाव:-
तालुका: -
पिन: -

सह दुय्यम निबंधक वर्ग-२
सह दुय्यम निबंधकाची सही
नाशिक-२

पुस्तक क्रमांक १ क्रमांक 2259
वर नोंदला.

दिनांक 5 माहे मार्च २००८

सह दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक - २

...णित करण्यात येते की,
...स्तामध्ये एकुण 25 पाने आहेत.

सह दुय्यम निबंधक वर्ग-२
नाशिक-२

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR Class-2 — सह दुय्यम निबंधक वर्ग-२, नाशिक-२ यांचे — NASIK-2



DSUMRY:045717SR105 Prepared on: 05/03/2008 17:06:21